## सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना
## संक्षिप्त टिप्पणी

| | |
|---|---|
| 1, सन.2005-06 मध्ये सर्वेक्षण केलेल्या कुटुंब संख्या | 42476 |
| 2. एकुण पात्र BPL कुटुंब सख्यां | 22,505 |
| 3, एकूण कुटुंबांतील व्यक्तींची संख्या | 1,12,525 |
| 6, शेजार समुह समिती | 204 |
| 7, शेजार समुह गट | 30 |
| 8, समाज विकास संस्था | 03 |
| 9, बचत गट स्थापन | 818 |

राज्यातील नागरी भागामध्येच दारीद्रय रेषेखालील लोकांचे राहणीमान उंचावण्यासाठी त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने दि. 1/12/97 पासून केंद्र सरकार पुरस्कृत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना सुरु करण्यात आली आहे. केंद्र सरकार 75 टक्के व राज्य सरकार 25 टक्क्े अनुदान या योजने प्रमाणे राबविण्यात येते.

या योजनेचा लाभ देताना लाभार्थ्यापैकि किमान 33 टक्के लाभार्थी महिला असल्या पाहिजे अनुसुचित जाती जमातीच्या लोकसंख्ये प्रमाणात लाभार्थी असले पहिजेत. 3 टक्के अपंग असावेत.15 % अल्पसंख्यांक असावे. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना ही सामुहीक सबलीकरणातून दारीद्रय निर्म्ुलनावर भर देणारी योजना आहे या योजनेत खालील घटकंाचा समावेश आहे

**1. सामाजिक संरचना :**

दारीद्रय रेषेखालील कुटुंबाना सामाजिक संरचेनेद्वारे संघटित करुन लाभार्थ्यांना या योजनेच्या रुपरेषा ठरवून देणे, तसेच योजनेच्या निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी करुन घेणे हया घटकाचे प्रमुख उद्यिष्टे आहे, योजनेची दैनंदिन अंमलबजावणी मुलभुत सोईसुविधा अंतर्गत तयार करण्यात आलेली सेवा केंद्रे लाभार्थ्यांना योजनेचे फायदे निश्चित करण्याची प्रक्रिया या मध्ये समाज विकास संस्थांचे प्रमुख भुमिका आहे.

मनपा क्षेत्रातिल दारिद्रय रेषेखालील एकूण कुटूंबे 21584 असुन सर्व कुटूंबे समाज विकास संस्थेस जोडण्यात आलेले आहेत. सदर संस्थेस प्रथम वर्ष प्रति कुटूंब 100रु. प्रमाणे व द्वितीय वर्षामध्ये प्रति कुटूंब 75 रु.प्रमाणे सी.डी.एस.च्या नावे निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.तो निधी संस्थेने बचत गट तयार करणे, साक्षरता,प्रचार महिला व बाल कल्याण,समाज कल्याण रोजगार व स्वयंरोजगार, तसेच सामाजिक कार्यक्रम हळदि कुंकू, तिळगुळ, बालसंगोपण,महिलांच्या स्पर्धा, महिला व बाल आरोग्य शिबीरे, महिला हक्क कायदेविषयक समानता, बाल संस्कार, बाल संगोपण, इ.कार्यक्रमावर खर्च करण्यात येतो. महानगरपालिका हद्दी मध्ये तीन समाज विकास संस्था असून त्यांच्या मार्फत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

1. **2.बचत व पतसंस्था :**

या योजनेमध्ये कमित कमी 05 महिला व जास्तीत जास्त 20 महिलांचा बचत गट तयार करण्यात येतो. या गटास एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर प्रति सदस्य रु.2000/- प्रमाणे फिरता निधी वाटप करण्यात येतो. आतापर्यन्त महानगरपालिका क्षेत्रात 810 बचत गट तयार करण्यात आले असुन 715 बचत गटांना फिरता निधी वाटप करण्यात आले आहेत. तसेच सालसन 2013-14 मध्ये 58 बचत गटांना फिरता निधी वाटपाची कार्यवाही चालु आहे.

**3.महिला व बालके यांचा विकास डाक्वा गट :**

महिलांच्या सामुहिक अर्थाजनाचा अंतिम टप्पा म्हणुन या घटकांकडे पाहिले जाते. स्व्यंयसहाय्यता गटांचे बचत गट व काटकसर गटांत रुपांतर झाल्यानंतर सामुहिक व्यवसायासाठी सदर गटास प्रोत्साहन म्हणुन रु.9,00,000/- लक्षा पर्यंत कर्ज राष्टीयकृत बँके मार्फत देण्यात येते. या गटास प्रकल्प किंमतीच्या 35 % अनुदान मिळण्यास गट पात्र असेल. प्रकल्प किमतीच्या 05 % एवढी रक्कम गटाचे बिज भांडवल असते.

सदर योजनेमध्ये अद्याप पर्यन्त 251 महिला बचत गटांना अनुदान देण्यात आलेले आहे.साल सन 2013-14 या वर्षामध्ये 174 बचत गटांना कर्ज मंजुर करण्यात आले आहे.योजनेच्या सुरूवातीपासुन एकुण 425 महिला बचत गटांना कर्ज व अनुदानाचा लाभ देण्यात आला आहे.

**4. प्रशिक्षण :**

या घटका अंतर्गत आतापर्यन्त 3032 लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. त्यात स्त्रिया 2632 व पुरुष 1200 आहेत. या प्रशिक्षणार्थ्यांना टेलरिंग व्यवसाय,दुचाकि वाहने दुरुस्ती,टि.व्ही.दुरुस्ती, संगणक,मोबाईल रिपेरिंग घरगुती उपकरणे, प्लंबर वेल्डर, इ.व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात आले आहेत. प्रशिक्षण योजनेत प्रशिक्षणार्थ्यास 3 ते 6 महिने किंवा 300 तासाचे प्रशिक्षण देण्यात येते. तसेच सालसन 2013-14 मध्ये एकुण 3083 चे उदिष्टये प्राप्त असुन पैकी 1571 विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झालेले आहे.

**5. स्वयंरोजगार :-**

या घटकाअंतर्गत आता पर्यन्त 1635 लाभार्थ्यांना कर्ज वाटप करण्यात आले असुन खर्च करण्यात आलेले आहेत. त्यांमध्ये स्त्रिया 319 व पुरुष 1035 आहेत. साल सन 2013 -14 मध्ये एकुण 494 लाभ देण्यात आलेला असुन सदर घटकात योजनेच्या सुरूवातीपासुन चालु आर्थिक वर्षापर्यंत एकुण 2129 लाभार्थ्यांना लाभ मिळालेला आहे.

सदरील लाभार्थ्यांना किराणा दुकान, पानपटटी, टेलरिंग, ऑटो, लाकूड विक्री, सेंट्रींग प्लेट, मिक्सर, कापड व्यवसाय, टेंट हाउस, सायकल दुकान,इ.साठी बँके मार्फत कर्ज वाटप करण्यात आले आहे.

**त्यासाठी लागणारी पात्रता :**

सदरील व्यक्ती दारीद्रय रेंषेखालील कुटूंबातील असली पाहिजे शैक्षणिक अहर्ता जास्तीत जास्त 7 वी पास पर्यन्त असावे.बि.पी.एल प्रमाणेपत्र, रहिवाशी प्रमाणपत्र, व्यवसायाचे कोटेशन, शिधा पत्रिका, लाईट बिल/मालमत्ता कराची पावती, निवडणुक ओळखपत्र, 20रू. बॉ डवर शपथपत्र मजूरी घटका करीता शैक्षणिक अर्हतेचे बंधन नाही. या घटक योजने अंतर्गत लाभार्थ्यांस बँकेने मंजुर केलेल्या रक्कमेवर 25% एवढे अनुदान देण्यात येते. 70 टक्के बँक कर्ज व लाभार्थी सहभाग 05% प्रमाणे रु.2,00,000/- पर्यन्त कर्ज देण्यात येते.ही योजना सर्वस्वी बँकेच्या सहकार्यावर अवलंबुन आहे.

**6. मुलभुत सोई सुविधा :**

या घटकाअंतर्गत लाभार्थ्यांना प्रशिक्षण,स्वयंरोजगार, महिला व बालके विकास या अंतर्गत लाभ देण्यात आल्यावर त्यांना व्यवसाय करणे सुलभ जावे यासाठी मुलभुत सोई सुविध या घटकामध्ये सहाय करण्यात येते. या मध्ये खालील कामे देण्यात येत आहे. सेवाकेंद्र,समाज केंद्र,बांधणे ,महिला गटांना विक्रीसाठी गाळाचे बांधकाम करणे,यासाठी अद्यापर्यंन दोन लोकसेवा केंद्र  व दहा गाळयांचे बांधकात करण्यात आले आहे तसेच लाभार्थ्यांना प्रशिक्षण योजने अंतर्गत लाभ देण्यात आला आहे अशांना व्यवसायनुरुप 600/-रुपये पर्यंन्त  आवश्यक टूलकिट देण्यात येते.आज पावेतो 10 गाळे व 2 सुविधा केंद्रे बांधण्यात आलेले आहेत.

**7. नागरी रोजगार योजना :**

या घटकामध्ये आता पर्यंत 127 कामे करण्यात आले असुन त्या मध्ये 84 दगडी नाली व खडीचा रस्ता 43 चे कामे करण्यात आलेले आहे.  या योजनेतील कामे दारिदय रेषेखालील मंजुरांकडुन घेण्यात येतात, यावर 40 टक्के खर्च मजुरी व बांधकाम साहित्यावर 60 टक्के खर्च करण्यात येतो. साल-सन 2011-12 पर्यंत प्राप्त खर्च करण्यासाठी 10 उद्यान विकसित करण्याचे कामाची निविदा देण्यात येवून 4 उद्यान पुर्ण होवून खर्च झालेला असुन 6775 मणुष्य दिन निर्मीती करण्यात आली आहे.

**सहायक आयुक्त तथा**
**स.प्रकल्प अधिकारी**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड